# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि २१२ /2020 दिनांक: १२/ 04/2020

वाचा – 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा – 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 160 /2020 दिनांक 31.03.2020
6. गृह मंत्रालय भारत सरकार यांचे NO.40-3/2020-DM-I(A) दिनांक 3/4/2020.
7. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक 1520/प्र.क्र.25/ना.पु.-23 दिनांक 2 एप्रिल 2020
8. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला यांचे दैनंदिन अहवाल.

## *आदेश*

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड – 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-19) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयामध्ये कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्याचे दृष्टीने दिनांक 14.04.2020 चे मध्यरात्रीपर्यंत सिमाबंदी व संचारबंदी लावण्यात आली आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग झालेली व्यक्ती आढळल्या आहेत. सदर व्यक्ती शहरी व ग्रामीण भागातील वस्तीमधील रहीवासी असल्याचे निदर्शनास आले आहे.

**त्याअर्थी,** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचनेनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्याचे दृष्टीने खालील प्रमाणे आदेश पारीत करित आहे.

1. नागरीकांच्या सार्वजनिक हिताचे दृष्टीने गर्दीच्या ठिकाणी तसेच सार्वजनिक ठिकाणी वावरणा-या व्यक्तीने गर्दीचे तसेच सार्वजनिक ठिकाणी वावरणा-या व्यक्तीने चेह-यावर मास्क,रुमाल किंवा इतर परिधान करणे आवश्यक आहे.
2. सर्व सार्वजनिक ठिकाणी जसे रस्ते, रुग्णालये, कार्यालये, भाजीबाजार या ठिकाणी मास्क,रुमाल किंवा इतर परिधान बंधनकारक करण्यात येत आहे.
3. खाजगी किंवा *कार्यालयीन* वाहनाने कुठेही वावरतांना सर्व व्यक्तीने आपले मास्क,रुमाल किंवा इतर परिधान करणे बंधनकारक आहे.
4. कोणत्याही व्यक्तीनी कार्यालये / कामाचे ठिकाणावर असे मास्क,रुमाल किंवा इतर परिधान करणे बंधनकारक आहे.
5. कोणत्याही व्यक्ती / अधिकारी यांनी चेह-यावर मास्क,रुमाल किंवा इतर लावल्याशिवाय सभा / बैठकीस उपस्थित राहू नये.

6. प्रमाणित मास्क हे औषधांच्या दुकानांमध्ये उपलब्ध असून ते वापरता येतील किंवा घरी बनविलेले मास्क सुध्दा वापरता येतील तसेच व्यवस्थीत धुवून निरजंतुकीरण केलेल मास्क,रुमाल किंवा इतर देखील वापरता येतील .

उपरोक्त नमूद केलेल्या आदेशाचे जो कोणी व्यक्ती अथवा संस्था अवज्ञा करेल अशी व्यक्ती / संस्था ही **भारतीय दंड संहिता,** (1860 **चा** 45 ) **याच्या कलम** 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल व त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक** 12 **एप्रिल** 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे

सत्यमेव जयते

**(जितेंद्र पापळकर,** भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी-**

1. मा. विभागीय आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक,अकोला यांना माहिती तथा आवश्यक कार्यवहीस्तव.
3. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला.
4. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
5. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका प्रशासन अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
6. मुख्याधिकारी, नगर परिषद ------------------------ सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. अधीष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय अकोला.
8. जिल्हा शल्यचिकित्सक सामान्य रुग्णालय अकोला.
9. उपविभागीय अधिकारी -------------------------- सर्व.
10. तहसिलदार ------------------------- सर्व.
11. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर बातमी जास्त खपाच्या वृत्तपत्रामधून विनामुल्य प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याकरिता.

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला